महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष : १८ ■ अंक : ९ ■ जानेवारी २०२४ ■ पाने : ८

# ग्राहक आणि महावितरणचे जीवन उजळवणारा सूर्योदय

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशभरातील एक कोटी घरांवर रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविण्यासाठी 'प्रधानमंत्री सूर्योदय योजना' जाहीर केली आहे. यामुळे मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांचे विजेचे बिल कमी होणार आहे तसेच ऊर्जा क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर होण्यास मदत होणार आहे. गरजेपेक्षा जास्त वीजनिर्मिती झाल्यास ती वीज कंपनीला विकून या कुटुंबांना उत्पन्नही मिळेल. या योजनेचा लाभ घरगुती ग्राहकांना करून देण्यासाठी देशव्यापी मोहीम राबविण्याची सूचना मा. पंतप्रधानांनी केली आहे.

मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी घरगुती ग्राहकांचे वीजबिल कमी होण्यासाठी रूफ टॉप सोलरवर भर देण्याची सूचना महावितरणला यापूर्वीच दिली आहे. रूफ टॉप सोलरच्या बाबतीत महावितरणची कामगिरी चांगली आहे. देशाचा प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी रोजी साजरा झाला. त्याच्या पूर्वसंध्येला दि. २५ जानेवारी रोजी महाराष्ट्रात रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविलेल्या ग्राहकांची संख्या १ लाख २४ हजार इतकी झाली असून त्यांची एकत्रित सौर ऊर्जानिर्मिती क्षमता १८६६ मेगावॅट इतकी झाली आहे. केंद्र सरकारच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने महावितरणला १८ जानेवारी २०२४ पर्यंत रूफ टॉप सोलरच्या माध्यमातून १०० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता गाठण्याचे उद्दीष्ट दिले होते. महावितरणने ते चार महिने आधीच गाठले तसेच एकूण १६४ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती क्षमता गाठून उद्दीष्टापेक्षा किती तरी जास्त कामगिरी केली. महावितरणच्या माध्यमातून रूफ टॉप सोलरचे काम पुढे चालूच आहे. या कामगिरीबद्दल मी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करतो.

**ग्राहकांना मदत करू**

वीज ग्राहकांनी घराच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसवून वीजनिर्मिती केली व ती वीज वापरली तर त्यांना महावितरणकडून कमी वीज घ्यावी लागते व परिणामी वीजबिल कमी होते. रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून वीज ग्राहकांना प्रति किलोवॅट १८ हजार रुपये अनुदान मिळते. त्यामुळे प्रत्यक्षात वीज ग्राहकाला कमी खर्च येतो. सामान्यतः घरगुती ग्राहकांना तीन किलोवॅट क्षमतेपर्यंतची सिस्टिम पुरेशी असते. महावितरण वीज ग्राहकांना रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविण्यासाठी मदत करते. महावितरणच्या https://www.mahadiscom.in/ismart/ या वेबसाईटवर त्यासंबंधीची संपूर्ण माहिती उपलब्ध आहे. महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना माझे आवाहन आहे की कंपनीमार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेची संपूर्ण माहिती घ्या आणि वीज ग्राहकांना मदत करा.

## हितगूज



**श्री. लोकेश चंद्र**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

वीज ग्राहकांना रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविण्यासाठी प्रोत्साहन देण्यामध्ये त्यांच्याशी संवाद करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याबाबतीत जनमित्रांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांचा गावोगावी वीज ग्राहकांशी थेट संपर्क असतो. लोकही त्यांना ओळखतात. एकेक जनमित्राने २० ते २५ वीज ग्राहकांना रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविण्यास मदत केली तरीही महावितरणची खूप मोठी कामगिरी होईल.

महावितरणच्या छोट्या ग्राहकांनी रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविणे हे कंपनीच्याही फायद्याचे आहे. छोट्या ग्राहकांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा केला जातो व त्याचा खर्च भरून काढण्यासाठी मोठ्या ग्राहकांना आणि औद्योगिक व्यावसायिक ग्राहकांना थोडा अधिकचा दर लावला जातो. याला क्रॉस सबसिडी म्हणतात. महावितरणच्या छोट्या ग्राहकांना वीज पुरवठ्यासाठी रूफ टॉप सोलरचा पर्याय उपलब्ध झाल्यावर स्वाभाविकपणे त्यांच्याकडून महावितरणच्या यंत्रणेतून कमी वीज वापरली जाईल व त्या प्रमाणात क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होईल. एकूणच ही योजना महावितरणचे अर्थकारण सुधारणारी आहे.

**बदलत्या काळानुसार महावितरणची वाटचाल**

विजेच्या बाबतीत जगभर चित्र बदलत आहे. वीज हा ऊर्जेचा सर्वात महत्त्वाचा स्त्रोत ठरत आहे. वाहतुकीसाठीही विजेच्या वापरावर भर देण्यात येत आहे. पारंपरिक, औष्णिक विद्युतसोबतच आता संपूर्ण जगभर सौर, पवन अशा नवीकरणीय ऊर्जानिर्मितीवर भर देण्यात येत आहे. बदलत्या परिस्थितीत महावितरण सौर ऊर्जानिर्मितीच्या बाबतीत खूप महत्त्वाचे योगदान देत आहे.

सौर ऊर्जा निर्मितीमध्ये रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविण्यात महावितरणने आतापर्यंत केलेल्या कामगिरीची वर चर्चा केलीच आहे. आता महावितरणने नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड, लातूर व अकोला या सात जिल्ह्यांमध्ये मोठ्या संख्येने रूफ टॉप सोलर सिस्टिम बसविण्यासाठी वीज ग्राहकांना मदत करण्याची मोहीम हाती घेतली आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही तर सौर ऊर्जानिर्मिती क्षेत्रातील देशातील अत्यंत महत्त्वाची योजना आहे. शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करण्याच्या हेतूने सौर ऊर्जेची सात हजार मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता निर्माण करण्याची ही योजना आहे. या गेमचेंजर योजनेची अंमलबजावणी खूप चांगल्या रितीने चालू आहे व त्यामध्ये महावितरणचे योगदान महत्त्वाचे आहे. एकूणच जगभर नवीकरणीय ऊर्जेवर भर दिला जात असताना महावितरणनेही सौर ऊर्जेच्या बाबतीत मोलाचे योगदान देणे, ही आपणा सर्वांना अभिमान वाटणारी बाब आहे. ■

# जिल्ह्यातील औद्योगिक ग्राहकांसाठी विद्युत भवनात 'स्वागत सेल' सुरू



स्वागत सेलच्या उद्घाटनप्रसंगी एमएसईबी सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. आशिष चंदाराणा सोबत मुख्य अभियंता श्री. दत्तात्रय पडळकर.

**अकोला** जिल्ह्यातील सर्व औद्योगिक वीज ग्राहकांना तत्पर वीज सेवा देण्यासाठी विद्युत भवन अकोला येथे जिल्हा स्तरावर एक स्वतंत्र 'स्वागत सेल' सुरू करण्यात आले आहे. एम.एस.ई.बी. सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. आशिष चंदाराणा यांच्या हस्ते या सेलचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मुख्य अभियंता श्री. दत्तात्रय पडळकर, अधीक्षक अभियंते सर्वश्री पवनकुमार कछोट, अनिल वाकोडे, इंडस्ट्रीयल असोशिएशन अकोलाचे अध्यक्ष श्री.उन्मेश मालू, सचिव श्री. नितिन बियाणी, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अकोलाचे अध्यक्ष श्री. निकेश गुप्ता, सचिव श्री. निरव बोरा, लघु उद्योग भारती अध्यक्ष श्री. पंकज बियाणी, सचिव श्री. अमित सराफ यांच्यासह उद्योजक व औद्योगिक संघटना प्रतिनिधींची उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलतांना स्वतंत्र संचालक श्री. आशिष चंदाराणा म्हणाले, राज्याचे मा. ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या कल्पनेतून उद्योजकांना अधिक तत्पर सेवा देण्यासाठी 'स्वागत सेल' ची निर्मिती राज्यातील सर्वच जिल्ह्यात करण्यात आली आहे. तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांच्या दुरदृष्टितून राज्यात २०३५ पर्यंतचे ४५००० मेगावॅट वीज निर्मिती, पारेषण आणि वितरणाचे नियोजन करण्यात आले असुन येत्या एप्रिल महिन्यापर्यंत त्याबाबत आराखडा तयार करण्यात येणार आहे. यावेळी स्वतंत्र संचालक यांनी अकोल्यातील उद्योजकांना कायम उत्तम सेवा देण्याचा महावितरणच्या प्रयत्नाबद्दल कौतूक केले.

जिल्ह्यातील सर्व औद्योगिक ग्राहकांना 'स्वागत सेल' च्या माध्यमातून डोअर स्टेप सेवा देण्यासाठी पूर्ण प्रयत्न राहणार आहे. 'स्वागत सेल'मुळे औद्योगिक ग्राहकांना वीजसेवा व तक्रारींसाठी स्थानिक कार्यालयाऐवजी आता थेट मंडल स्तरावर संपर्क साधता येणार असल्याचे यावेळी मुख्य अभियंता श्री. दत्तात्रय पडळकर यांनी सांगितले. अधीक्षक अभियंता श्री.पवनकुमार कछोट यांनी स्वागत सेल व त्याच्या कार्यपध्दतीबद्दल सविस्तर माहिती दिली. ■

# चंद्रपूरातील ३७ 'प्रकाशदूतां'कडून नेत्रदानाचा संकल्प



शिबिरात बोलताना मुख्य अभियंता श्री. सुनील देशपांडे, सोबत मान्यवर.

**ग्राहकसेवा** देत जनजीवन प्रकाशमान ठेवणाऱ्या चंद्रपूर परिमंडलातील ३७ प्रकाशदूतांनी अंध व्यक्तींच्या आयुष्यात प्रकाश पेरण्यासाठी मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केला व त्याप्रमाणे संकल्पपत्र भरुन दिले. यामध्ये मुख्य अभियंता श्री. सुनील देशपांडे, अधीक्षक अभियंता श्रीमती संध्या चिवंडे यांचाही समावेश आहे.

चंद्रपुर परिमंडलाच्या कार्यालयात नागपूर येथील रौशनी फाऊंडेशन आणि माधव नेत्रालय यांच्या संयुक्त सहकार्याने नेत्रदान जागरुकता व मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात महावितरणच्या ९५ अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

शिबिराला रौशनी फाऊंडेशनचे श्री. राजेंद्र जैन, माधव नेत्रालयाचे श्री. अनिरुद्ध सोमण, सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता श्री. सुहास मेत्रे, कार्यकारी अभियंता सर्वश्री चंद्रशेखर दारवेकर व सत्यदेव पेंगलपट्टी आदींची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती किर्ती चांभारे यांनी केले तर उपकार्यकारी अभियंता श्री. विश्लेष लांजेवार यांनी आभार मानले. ■

# सातारा मंडलात आरोग्य शिबीर संपन्न

**सातारा** मंडल कार्यालय व सातारा हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने सातारा मंडल अंतर्गत कर्मचाऱ्यांसाठी नुकतेच आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबीराचा १६५ कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला.

वीज कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामे करताना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते. त्यासाठी त्यांचे आरोग्य चांगले असणे आवश्यक असून, त्यासाठी नियमित तपासणी व उपचार गरज लक्षात घेत मंडल कार्यालय परिसरात सातारा हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटरच्या वैद्यकिय टीमकडून रक्तशर्करा तपासणी, इसीजी, रक्तदाब, नेत्ररोग व सर्वसाधारण तपासणी मोफत करण्यात आली.

शिबीराचे उद्घाटन अधीक्षक अभियंता (प्र.) श्री. अमित बारटक्के यांचे हस्ते झाले. शिबीराच्या यशस्वीतेसाठी व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. देवदत्त माने व हॉस्पिटलतर्फे श्री. श्रीकांत देशमुख यांनी परिश्रम घेतले. ■



आरोग्य तपासणी करताना कर्मचारी.

# 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' योजनेचे दालन



दालनाचे उद्घाटन संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर यांच्या हस्ते करण्यात आले. सोबत उपस्थित मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री.भारत पवार, अधिक्षक अभियंता श्री. प्रवीण अन्नछत्रे व निखील मेश्राम



दालनास एमएसईबी सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक यांनी भेट दिली. यावेळी मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. भारत पवार यांनी श्री. पाठक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले

**भारतीय** इलेक्ट्रिकल उपकरणे उत्पादन उद्योगाची संघटना असलेल्या इंडियन इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन अर्थात IEEMA ने आयोजीत केलेल्या 'बीआयडी २०२४' सोहळा बॉम्बे एक्झीबेशन सेंटर, गोरेगाव, मुंबई येथे १६ ते १८ जानेवारी दरम्यान आयोजीत करण्यात आला होता.

या प्रदर्शनात महावितरणच्या वतीने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' या योजनेची माहिती देणारे दालन उभारण्यात आला होता. यावेळी मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची सदरच्या योजनेविषयी माहिती देणारी चित्रफित दाखवण्यात आली.

'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' या योजनेच्या दालनाला देशभरातील अभियंते, विद्यार्थी, अभ्यासक व नागरिक यांनी भेट देऊन योजनेची उत्सुकतेने माहिती घेतली. यावेळी या योजनेची माहिती देणाऱ्या पत्रकाचे वितरण करण्यात आले तसेच योजनेची माहिती देणारा माहितीपट दाखवण्यात आला. ■

# प्रकाशगड मुख्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा



ध्वजारोहन करताना महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन

भारतीय प्रजासत्ताकाचा अमृत महोत्सव महावितरण व महानिर्मितीचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड येथे उत्साहात साजरा करण्यात आला. महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन यांच्या हस्ते प्रकाशगड मुख्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी महावितरणचे संचालक (मासं.) श्री. अरविंद भादिकर, महानिर्मितीचे संचालक (वित्त) श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) श्री. अभय हरणे यांच्यासह महावितरण व महानिर्मितीचे वरिष्ठ अधिकारी, विभाग प्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ■

# कु. स्वरूपा घाग हीचे बास्केटबॉलमध्ये यश

कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वुमेन या महाविद्यालयातील कु. स्वरूपा घाग हिची आय.टी. एम. विद्यापीठ, ग्वाल्हेर येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठीय स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या बास्केटबॉल संघात निवड झाली. कु. स्वरूपा बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझाईनच्या चतुर्थ वर्षात शिकत आहे. कोल्हापूर मंडलात उपव्यवस्थापक (वित्त व लेखा) पदी कार्यरत श्री. दत्तात्रय घाग यांची ती कन्या आहे. ■



कु. स्वरूपा घाग

# चि. अभिषेक सोनोने यास एम. एस. पदवी बहाल

चि. अभिषेक सोनोने यास अमेरिकेतील प्रसिद्ध वेस्टर्न मिशिगन युनिव्हर्सिटीने मास्टर्स ऑफ सायन्स (इंडस्ट्रिअल इंजिनिअरिंग) ही पदवी नुकतीच बहाल केली आहे. अमेरिकेत शिकताना ऑटोमोबाईल कंपनीत क्वालिटी इंजिनिअर पदावर काम करून शिक्षण पूर्ण केले आहे. चि. अभिषेक हा छत्रपती संभाजीनगर परिमंडलात कार्यरत कार्यकारी अभियंता (प्रशासन) श्री. दीपक सोनोने यांचा मुलगा आहे. ■



चि. अभिषेक सोनोने

# महावितरणचा दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठीचा पुढाकार प्रेरणादायी

## परिवहन अधिकारी श्री. रमेश कुल्लूरकर




दिव्यांग कर्मचाऱ्यांना वाहन वाटप करताना मान्यवर.

**राज्य** सरकारच्या परिपत्रकानुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी सहायक उपकरणे देण्यात महावितरणने पुढाकार घेतला आहे. सामाजिक जाणिवेतून महावितरणने घेतलेला हा पुढाकार प्रेरणादायी आहे. दिव्यांगांना दैनंदिन कार्यालयीन कामकाज अधिक सुलभ करण्यासाठी सहायक उपकरणे महत्वाची ठरणार आहेत, असे प्रतिपादन कल्याण येथील सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. रमेश कुल्लूरकर यांनी केले.

राज्य सरकारी सेवेतील दिव्यांग कर्मचाऱ्यांना सहायक उपकरणे पुरवण्याबाबत सरकारने परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार कल्याण परिमंडलातील चार दिव्यांग कर्मचाऱ्यांना दुचाकींचे वाटप करण्यासाठी परिमंडल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता श्री. धनंजय औंढेकर होते. कल्याण मंडल एकचे अधीक्षक अभियंता श्री. दीपक पाटील, कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता श्री. दिलीप भोळे, सहायक वाहन निरिक्षक श्री. विजय नरवाडे, श्रीमती अक्षया बनसोडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी कल्याण परिमंडलाने घेतलेल्या पुढाकाराबद्दल प्रहार संघटनेने कृतज्ञता व्यक्त करत मुख्य अभियंता श्री. औंढेकर यांचा विशेष सन्मान केला. यावेळी प्रहार संघटनेच्या राज्य सचिव श्रीमती भक्ती भंडारी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. रामगोपाल अहिर, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रणाली विश्लेषक श्रीमती रंजना तिवारी, मानव संसाधन विभागाचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. निलेश भवर, श्री. शशिकांत पोफळीकर, कर्मचारी, अधिकारी, अभियंते व कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. ■

# नाशिकच्या तपोवन व म्हसरूळ विद्युत उपकेंद्राना आयएसओ मानांकन

**नाशिक** मंडलात असलेल्या तपोवन व म्हसरूळ येथील दोन्ही ३३/११ विद्युत उपकेंद्रांना एकाचवेळी २०२४ या नवीन वर्षात सुरुवातीचे आयएसओ ९००१:२०१५ मानांकन प्राप्त झाले आहे. ग्राहकांना गुणवत्तापूर्ण आणि अखंडीत सेवा देण्यासाठी उपकेंद्रामध्ये केलेले भरीव कार्य कौतुकास्पद असून याची इतरांनी प्रेरणा घेऊन या नवीन वर्षात नाशिक परिमंडलातील सर्व विद्युत उपकेंद्रे आणि कार्यालये यांना आयएसओ मानांकन मिळविण्यासाठी संपूर्ण क्षमतेने प्रयत्नरत राहण्याचे आवाहन नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर यांनी केले. यावेळी आयएसओ मानांकन कोनशिलाचे अनावरण श्री. कुमठेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी नाशिक मंडलाचे अधिक्षक अभियंता श्री. ज्ञानदेव पडळकर व प्रमुख अतिथी म्हणून कार्यकारी अभियंते सर्वश्री चेतन वाडे, शैलेश जैन, राजाराम डोंगरे, माणिकलाल तपासे, केशव काळूमाळी व निलेश चालिकवार हे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी दोन्ही विद्युत उपकेंद्रांना आयएसओ मानांकन मिळवण्यासाठी परिश्रम घेतल्याबद्दल पंचवटी उपविभागाचे अभियंते, यंत्रचालक व जनमित्रांचा पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देवून मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर यांचे हस्ते सन्मान करण्यात आला.

सोहळ्याला सहाय्यक महाव्यवस्थापक सर्वश्री महेश बुरंगे व लक्ष्मण वसावे, उपमुख्य औदयोगिक संबंध अधिकारी श्री. प्रमोद राजेभोसले, कार्यकारी अभियंता श्री. नंदकिशोर काळे, अभियंते, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंचवटी शाखा कार्यालयाचे सहाय्यक अभियंता श्री. चंदन पिंपळे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन यंत्रचालक श्री. भूषण सोनवणे यांनी व आभार प्रदर्शन तपोवन उपकेंद्राचे यंत्रचालक श्री. अविनाश अहिरे यांनी केले. ■



म्हसरूळ येथे आयएसओ मानांकन प्रमाणपत्र देऊन गौरव करताना मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर सोबत मान्यवर.

# विहा मांडवा येथे पी.एम.कुसुम घटक – क योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील पहिला सौर ऊर्जा प्रकल्प

प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवं उत्थान महाअभियान योजना (कुसुम घटक) क अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विहा मांडवा (तालुका पैठण) येथे ३ मे.वॅ.क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यालयातील मुख्य अभियंता (नवीकरणीय ऊर्जा) श्रीमती कविता घरत व छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे यांच्या हस्ते झाले.

उद्घाटन कार्यक्रमास अधीक्षक अभियंता श्री. प्रविण दारोली, अधिक्षक अभीयंता श्रीमती शुभांगी कटकधोंड, अधीक्षक अभियंता श्रीमती बिना सावंत, कार्यकारी अभीयंते सर्वश्री व्ही. एम. शिंदे व सिद्धार्थ नायडू, कालिका जीनिंग अँड प्रेसिंग प्रा.लि. चे संचालक श्री. अजित शिसोदीया, आदित्य ग्रीन एनर्जी प्रा.लि. चे श्री. आदिनाथ संगवे, श्री. विपुल जोइशर व श्री. जयेश बजाज इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कुसुम घटक – क योजनेअंतर्गत सुमारे १५ एकर जागेत उभारलेला हा महाराष्ट्रातील पहिला प्रकल्प आहे. या प्रकल्पातून विहा मांडवा उपकेंद्राच्या माध्यमातून लगतच्या हिरडपुरी, विहा मांडवा शिवार, हिंगणे, ब्रह्मणगाव, इंदेगाव या गावातील अंदाजे १६०० कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठयाचा लाभ घेता येईल. ■



▸▸ प्रकल्पाचे उद्घाटन करताना मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे व श्रीमती कविता घरत.

# कर्मचाऱ्यांनी लातूर शहरात ६० निराधारांना केले ब्लॅकेट्सचे वाटप



▸▸ गरजूंना मायेची उब देणारी टीम

**घरगुती** वीज ग्राहकांपासून ते औद्योगिक ग्राहकांना ऊर्जा देणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामाजिक भान जपत हुडहुडी भरणाऱ्या थंडीपासून बचाव व्हावा या उद्देशाने बसस्थानक व रेल्वेस्टेशनवरती निराधाराचे जीवन जगणाऱ्या माणसांना ब्लँकेटचे वाटप करून त्यांना मायेची ऊब दिली.

लातूर शहरात तापमानाचा किमान पारा दिवसें दिवस १५ अंशांपर्यत खाली येत असून वातावरणात प्रचंड गारठा वाढला आहे. यामुळे नागरिकांना हुडहुडी भरू लागली आहे. अशा परिस्थितीत उघड्यावर रात्र काढणाऱ्यांना थंडीपासून बचावासाठी कोणतेच साधन उपलब्ध नसते. याची दखल घेत शहरातील शाखा क्रमांक तीन मधील सहाय्यक अभियंता श्री. राहुल गाडे यांच्या पुढाकाराने व सर्वश्री विनोद मुंडे, बालाजी गायकवाड, बालाजी यादव, मारोती मुंडे, बालाजी माने, लक्षमन गायकवाड, विशाल मृगजळे, मोतीपल्ले या कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने वर्गणी गोळा करून शहरातील फुटपाथ, बस स्थानक, रेल्वे स्थानक, पार्किंग व मंदिर परिसर आदी विविध ठिकाणी उघड्यावर झोपलेल्या थंडीत कुडकुडणाऱ्या निराधार व बेवारस व्यक्तींना रात्री फिरुन ब्लॅकेट वाटप करण्यात आले.

यावेळी ६० जणांना या माध्यमातून मायेची ऊब मिळाली. या संवेदनशील कार्याबद्दल सहायक अभियंता श्री. राहूल गाडे व त्यांच्या संपुर्ण टीमचे सर्वत्र कौतूक होत आहे. ■

# श्रीमती वैशाली अग्नीहोत्री आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या पंच

**नेपाळची** राजधानी काठमांडू येथे नुकताच पार पडलेल्या साऊथ एशियन ऐरोबिक आणि हिप – हॉप चँम्पीयनशीप २०२३ या आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या पंच (रेफ्री) म्हणून श्रीमती वैशाली अग्नीहोत्री उपस्थित होत्या. त्यांची निवड एशियन फिटनेस एरोबिक्स अँड डान्स फेडरेशनतर्फे करण्यात आली होती.

अमरावती परिमंडल कार्यालयाअंतर्गत ग्राहक तक्रार निवारण मंच येथे कनिष्ठ लिपीक म्हणून कार्यरत असणाऱ्या श्रीमती वैशाली उर्फ पल्लवी अग्नीहोत्री यांची आंतरराष्ट्रिय पंच म्हणून केलेली कामगीरी ही महावितरणसाठी अभिमानास्पद आहे. याबद्दल मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी यांनी श्रीमती वैशाली अग्निहोत्रीचे कौतूक करत अभिनंदन केले.

श्रीमती वैशाली अग्निहोत्री उर्फ पल्लवी नारायण चिखलकर या अमरावती जिल्हा स्पोर्ट्स एरोबिक्स अँड फिटनेस असोसिएशनच्या प्रशिक्षक व सचिव म्हणूनही जबाबदारी पार पाडतात. काठमांडू नेपाळ येथे झालेल्या स्पर्धेमध्ये भारत, बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका व भूतान असे एकूण पाच देश सहभागी झाले होते. तेथे भारतीय टीमला हिप हॉप या क्रीडा प्रकारात गोल्ड मेडल व फिटनेस या क्रीडा प्रकारात सिल्व्हर मेडल प्राप्त झाले. तसेच फर्स्ट विनर ट्रॉफी भारताने जिंकली. ■



▸▸ मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी यांच्या हस्ते वैशाली अग्रिहोत्री यांचा सत्कार करण्यात आला. सोबत मान्यवर.

# विटेक्स प्रदर्शनीतील महावितरणच्या दालनास हजारो ग्राहकांची भेट




दालनाचे उद्घाटन करताना स्वतंत्र संचालक श्री. आशिष चंदाराणा सोबत मान्यवर

**अकोला** येथे नुकतेच पार पडलेल्या विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या विटेक्स या व्यापार उद्योग प्रदर्शनीतील महावितरणच्या दालनास ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. आशिष चंदाराणा यांच्या हस्ते दालनाचे उद्घाटन झाले.

या प्रदर्शनात विविध उत्पादने व संस्थांची दीडशेहून अधिक दालने होती. यात महावितरणच्या दालनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. महावितरणच्या दालनात शासन व कंपनीतर्फे वीज ग्राहकांसाठी सुरू असलेल्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.०, रूफ टॉप सोलर योजना, गो ग्रीन, ऑनलाईन पेमेंट यासह विविध योजनांची माहिती नागरिकांना दिली.

या उपक्रमाबाबत ग्राहकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी दालनात लावलेले ऊर्जा बचत व विद्युत सुरक्षा याचा संदेश देणारे बॅनर उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते. यावेळी महावितरणचे अधीक्षक अभियंता श्री. पवनकुमार कछोट हेही उपस्थित होते. ■

# जलतरण स्पर्धेत श्री. श्रीपाद काळे यांना सुवर्णपदक




सुवर्ण पदक आणि प्रमाणपत्र स्विकारतांना श्री. श्रीपाद काळे

**नागपूर** येथे आयोजित ''खासदार क्रीडा महोत्सव'' या क्रिडा स्पर्धेतील जलतरण या क्रीडा प्रकारात १०० व २०० मीटर बॅकस्ट्रोक या दोन्ही स्पर्धेत श्री. श्रीपाद काळे यांनी प्रथम क्रमांक मिळवित विजेतेपद पटकाविले. १०० मीटर फ्रीस्टाईल स्पर्धेतही कास्य पदक प्राप्त केले. नागपूर परिमंडलांतर्गत उमरेड (शहर)-२ शाखा कार्यालय येथे सहायक अभियंता म्हणुन श्री. श्रीपाद काळे कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल नागपूर परिक्षेत्राचे प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी, मुख्य अभियंता श्री. दिलिप दोडके व सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. ■

# 'राष्ट्रीय मतदार दिवस' निमित्ताने कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ




कर्मचाऱ्यांना शपथ देताना मान्यवर

**'राष्ट्रीय मतदार दिवस'** निमित्ताने महावितरणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड येथील कर्मचाऱ्यांना संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे यांनी शपथ दिली. यावेळी संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा ) श्रीमती स्वाती व्यवहारे व अधिकारी - कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ■

# कल्याण परिमंडलात महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६७ प्रकाशदुतांचे रक्तदान

**कल्याण** परिमंडलातील उल्हासनगर विभाग दोन अंतर्गत अंबरनाथ पूर्व आणि पश्चिम उपविभागाकडून महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात उल्हासनगर विभाग दोनचे कार्यकारी अभियंता श्री. प्रवीण चकोले यांच्यासह ६७ अधिकारी, अभियंते व जनमित्रांनी रक्तदान केले. सामाजिक बांधिलकीतून अंबरनाथ उपविभागाने हा उपक्रम राबवला.

सुरवातीस मुख्य अभियंता श्री. धनंजय औंढेकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचे उदघाटन करण्यात आले. कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता श्री. दिलीप भोळे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरात १०२ जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

अंबरनाथ पूर्व आणि पश्चिम उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता अनुक्रमे श्री. जितेंद्र प्रजापती व श्रीमती अलका कावळे, संघटना प्रतिनिधी, अभियंते, जनमित्र यांच्या पुढाकारातून हे शिबिर यशस्वी करण्यात आले. ■



शिबिराप्रसंगी उपस्थित अधिकारी व कर्मचारी

# नाशिक जिल्ह्यातील दुर्गम भागात आदिम जमातींना वीज पुरवठा मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कावनाई येथे लाभार्थ्यांशी संवाद




मान्यवरांच्या हस्ते विद्युत जोडणी मिळालेल्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

**देशातील** आदिम जमातींच्या सर्वांगिण विकासासाठी सुरू केलेल्या प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (पीएम जनमन) आदिवासी कल्याणासाठी एक दूरदर्शी प्रकल्प असलेल्या या योजनेत ११ मूलभूत सोईसुविधेमध्ये दुर्गम भागातील आदिम जमातींच्या घरांना वीज पुरवठा करण्याचे उद्दीष्ट देण्यात आले होते. त्यानुसार नाशिक जिल्ह्यात ८७२ इतक्या वीज जोडण्या दिल्या असून महावितरणच्या या तात्काळ पुढाकारामुळे प्रत्यक्षात आदीम जमातींची घरे नववर्षात उजळण्यात यश मिळाले आहे. मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी कावनाई (ता. इगतपुरी) येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आदिम कातकरी जमातीचे लाभार्थी कावनाईचे सौ. भारती रण व श्री.भाऊसाहेब रण यांच्याशी विकासाबाबत थेट संवाद साधून माहिती घेतली.

यावेळी आयोजित संवाद कार्यक्रमात मंचावर ना. केंद्रीय आरोग्य, कुटुंब तथा जनजाती राज्यमंत्री श्रीमती भारतीताई पवार, ना. आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, विधानसभा उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवळ, खासदार श्री. हेमंत गोडसे, आमदार श्री. हिरामण खोसकर, जिल्हाधिकारी श्री. जलज शर्मा, आदिवासी विकास आयुक्त श्रीमती नयना गुंडे, आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती लीना बनसोडे व जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती आशिमा मित्तल व नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्युत जोडणी मिळालेल्या श्री. भाऊसाहेब रण, श्रीमती कल्पना वाघ, श्री. नामदेव गावित, श्री. सुरेश वाघ व श्री. सखाराम मुकणे या लाभार्थ्यांना वीज जोडणी प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

राज्यात विविध विभागांमार्फत आदिम जमातींना ११ प्राधान्य क्षेत्रांची सेवा उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ट निश्चित केले आहे. महाराष्ट्रातील आदिम जमातींच्या वस्त्यांमध्ये त्यानुसार काम करण्याचा आराखडा निश्चित करण्यात आला. महावितरणला उपलब्ध झालेल्या सर्वेक्षणात नाशिक जिल्ह्यात अजूनही वीज पुरवठा मिळाला नसलेली आदिम जमातीची घरे आढळली. या घरांना तात्काळ वीज पुरवठा करण्यात आला. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी महावितरणचे सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**स्टॉलच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती व जनजागृती**

कार्यक्रमस्थळी विविध शासकीय विभागांचे माहिती देणारे स्टॉल लावण्यात आले होते. यामध्ये महावितरणच्या दालनामध्ये चित्रफितीच्या माध्यमातून या योजनेत दुर्गम भागात राहणाऱ्या दुर्बल आदिवासी घटकांना महावितरणच्या यंत्रणेने अथक परिश्रम घेऊन वीज जोडणी दिली याची माहिती देण्यात आली. त्याबरोबर जोडणी मिळाल्याचा आनंद आणि त्याचे भावी जीवनात होणारे फायदे या संदर्भात लाभार्थ्यांची मनोगते दाखविण्यात आली. ■

# पुणे परिमंडलातील तीन उपकेंद्रांना 'आयएसओ'चे मानांकन

**पुणे** परिमंडल अंतर्गत शिवाजीनगर विभागातील तीन उपकेंद्रांनी एकाच वेळी 'आयएसओ ९००१:२०१५'चे मानांकन मिळविले आहे. राज्यात प्रथमच तीन उपकेंद्रांना एकाचवेळी 'आयएसओ'च्या मानांकनाचा बहुमान मिळवला आहे. रास्तापेठ येथील 'प्रकाशदूत' सभागृहात आयोजित कार्यक्रमात मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार व 'आयएसओ'चे अंकेक्षक व परीक्षक श्री. नंदकिशोर देशमुख यांच्या उपस्थितीत संबंधित उपकेंद्रांना 'आयएसओ' मानांकनाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्या निर्देशानुसार शिवाजीनगर विभागातील सुस रोड २२/११ केव्ही उपकेंद्र (गणेशखिंड उपविभाग) तसेच मोहननगर व अमर पॅराडिगम २२/२२ केव्ही स्विचिंग स्टेशन (औंध उपविभाग) या तीन उपकेंद्रांनी एकाचवेळी आयएसओ ९००१:२०१५ च्या मानांकनासाठी पुर्वतयारी सुरु केली. यामध्ये उपकेंद्रांची गुणवत्ता, कामकाजाचा दर्जा, सर्व प्रकारची सुरक्षा उपाययोजना व उपकरणांची उपलब्धता, दस्ताऐवजीकरण, वैद्यकीय सुविधा, सुशोभीकरण आदी कामे करण्यात आली.

त्यानंतर आयएसओ ९००१:२०१५ च्या पथकाने या तिनही उपकेंद्रांना भेट दिली व तब्बल २७ अटी व शर्तींच्या मानकांप्रमाणे तपासणी केली. यात तिनही उपकेंद्र 'आयएसओ'च्या मानांकनासाठी पात्र ठरले. मानांकन मिळविण्यासाठी शिवाजीनगर विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. संजीव राठोड, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सर्वश्री विश्वास भोसले, सचिन पाटील, पंडित दांडगे यांच्यासह सहायक अभियंता श्री. रमेश सुळ, श्री. गणेश श्रीखंडे, तंत्रज्ञ सर्वश्री बाळासाहेब खिलारे, सचिन कांबळे, महेश सुतार, हनुमंत शिंगटे व कु. शुभांगी शिरोळे यांनी कामगिरी केली. ■




उपकेंद्रांना आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्रदान करताना मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार व श्री. नंदकिशोर देशमुख, सोबत मान्यवर

# महावितरणचे मोबाईल ॲप्स

**महावितरणने** नवीन कनेक्शन ॲप, मालमत्ता सर्वेक्षण ॲप, कर्मचारी मित्र ॲप, मीटर रीडिंग ॲप, आरई ॲप (नूतनीकरणयोग्य ऊर्जा) असे पाच मोबाइल ॲप हे कर्मचारी आणि कंत्राटी एजन्सीसाठी विकसित केलेले आहेत. हे ॲप अँड्रॉइड आणि आयओएस प्लॅटफॉर्मवर इंग्रजी आणि मराठीमध्ये उपलब्ध आहेत. आपण प्रत्येक महिन्यात यातील एका ॲपची माहिती जाणून घेत आहोत. यापूर्वी आपण नवीन कनेक्शन ॲप व मालमत्ता सर्वेक्षण ॲप यांची माहिती घेतली होती. आता या महिन्यात आपण अँड्रॉइड लॅटफॉर्मवर इंग्रजी आणि मराठीमध्ये उपलब्ध असलेल्या **रिन्यूएबल एनर्जी** ॲपची माहिती करून घेणार आहोत.

## रिन्यूएबल एनर्जी ॲप

**रिन्यूएबल एनर्जी ॲप** हे मोबाइल ॲप मुख्यत्वे नवीकरणीय ऊर्जा (RE-Vendor) आणि मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना (MSKPY – अधिक्षक अभियंता आणि पुरवठादार ) योजनेशी संबंधित आहे. रिन्यूएबल एनर्जी ॲप हे अधिक्षक अभियंता व नोंदणीकृत पुरवठादार यांना पुढील पद्धतीने वापरता येते.

१) मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना (एमएसकेपीवाय – अधिक्षक अभियंता):

- **ॲप्रूव्ह ए १ :** मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजने अंतर्गत 'A1 To Be Approved'1 स्थिती असलेल्या अर्जाची यादी दिसते. यामध्ये सबंधित अधिक्षक अभियंता आधार कार्ड व ७/१२ अहवालासह आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करू शकतात. अधिक्षक अभियंता निरीक्षणांवर आधारित 'मंजूर करा', 'नकार द्या' किंवा 'ऑन-होल्ड' असा पर्याय निवडू शकतात.
- **अपडेट मोबाईल नंबर :** या मेनूचा वापर करून लाभार्थीचा नवीन मोबाईल नंबर अपडेट केला जाऊ शकतो.
- **अपलोड /ॲप्रूव्ह जेएसआर :** येथे ज्या अर्जांना 'पुरवठादाराची माहिती प्राप्त झाली' अशा अर्जदारांची माहिती दर्शविली जाते. संयुक्त सर्वेक्षण अहवालाची (JSR) सर्व माहिती भरणे, तुमच्या डिव्हाइसमधून JSR फाईल निवडणे आणि 'सबमिट' करणे हे पर्याय याअंतर्गत उपलब्ध आहेत.
- **डायग्नोस्टिक्स :** हा पर्याय अडचणी तपासण्याच्या उद्देश्यासाठी वापरला जातो.

**२) मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना (एमएसकेपीवाय –पुरवठादार):**

- **अपलोड जेएसआर :** यामध्ये पुरवठादाराची माहिती प्राप्त झालेल्या अर्जाची यादी दर्शविली जाते. संयुक्त सर्वेक्षण अहवाला (JSR) संबंधी सर्व आवश्यक माहिती भरली असल्याची खात्री करणे, डिव्हाइसवरून JSR फाईल अपलोड करून 'सबमिट' करता येते.
- **इन्स्टॉलेशन कमिशनिंग :** यामध्ये 'जॉइंट सर्व्हे रिपोर्ट अप्रूव्ह्ड' या स्थितीसह असलेले अर्ज दर्शविले जातात .


  **अ) इन्स्टॉलेशन पूर्वी लाभार्थीच्या साइटचा फोटो :** इन्स्टॉलेशनपूर्वी लाभार्थीच्या साइटचा फोटो अपलोड करण्यासाठी लाभार्थी किंवा अर्ज निवडा. तुमच्या डिव्हाईससह एक फोटो घ्या आणि 'सबमिट' बटणावर क्लिक करा.

  **ब) इंस्टॉलेशन रिपोर्ट आणि हमीपत्र अपलोड करा:** तुमच्या डिव्हाईसवरून हमीपत्र आणि इंस्टॉलेशन रिपोर्ट फाइल्स निवडा, त्यानंतर सबमिट करा बटणावर क्लिक करा.

  **क) इन्स्टॉलेशन नंतर लाभार्थीच्या साइटचा फोटो :** इन्स्टॉलेशन नंतर लाभार्थीच्या साइटचे चित्र अपलोड करण्यासाठी, अर्ज किंवा लाभार्थी निवडा. तुमच्या डिव्हाईससह एक फोटो घ्या आणि 'सबमिट' बटणावर क्लिक करा.

३) **नवीकरणीय ऊर्जा (पुरवठादार)**

- **रूफटॉप सोलर कमिशनिंग :** याद्वारे छतावरील सौर ऊर्जा चालू झाल्याचे दस्तऐवज पुरवठादाराद्वारे अपलोड केले जाऊ शकतात. स्क्रीनवर कमिशन केलेले अर्ज दर्शविले जातात. निवड केल्यानंतर अर्जाची माहिती वरील बाजूस दिसते. 'अपलोड डॉक्युमेंट' वर क्लिक करून कोणती कागदपत्रे अपलोड करायचे ते तुम्ही निवडू शकता. डिव्हाईसमधून प्रत्येक दस्तऐवज निवडा किंवा सुस्पष्ट फोटो घ्या आणि अपलोड करा.
- **डायग्नोस्टिक्स:** हा पर्याय अडचणी तपासण्याच्या उद्देश्यासाठी वापरला जातो. ■




Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574 & Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : श्री. भारत पवार • उपसंपादक : श्री. विश्वजीत भोसले
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)